# Alumni, Parents and Teacher Meet

## Session Wise Activities

### माजी विद्यार्थी संघटनेतर्फे शिष्यवृत्ती वाटप



**ब्रह्मपुरी** : येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयातील माजी विद्यार्थी संघटनेतर्फे महाविद्यालयातील आजी गरीब, होतकरु विद्यार्थ्यांना 'माजी विद्यार्थी संघटना विशेष शिष्यवृत्ती' प्राचार्य, डॉ एन एस कोकोडे, उपप्राचार्य, डॉ धनंजय गहाणे, डॉ दिगांबर पारधी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. यासाठी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी डॉ. धनराज खानोरकर, डॉ अजित खाजगीवाले, डॉ डी एच गहाणे, डॉ डी ए पारधी यांनी विशेष आर्थिक मदत विद्यार्थ्यांसाठी दिल्यामुळे प्राचार्यांनी त्यांना धन्यवाद दिले. वेबसाईटवर महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी फार्म भरून आपणही या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन प्राचार्य,एन एस डॉ कोकोडे, प्रभारी डॉ राजू आदे, डॉ सुभाष शेकोकर यांनी केले आहे.

**Session 2018-19 : On behalf of Alumni, Parents & Teacher Association, Scholarship provided to needy students**

# नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय

ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर

## शिक्षक-पालक व माजी विद्यार्थी संघटना

आपणास निमंत्रित करतांना अत्यानंद होत आहे की, महाविद्यालयातर्फे **शिक्षक-पालक व माजी विद्यार्थी यांची संयुक्त सभा** दि. ३० एप्रिल २०१९ रोज मंगळवारला सकाळी ९.३० वा. स्वगीय हिरालालजी भैया सभागृह, ने. हि. महाविद्यालय, ब्रम्हपुरी येथे आयोजित केलेली आहे.

आपण आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे सन्माननीय पालक/महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आहात. आपल्या सूचना व मौलीक मार्गदर्शन आमच्या महाविद्यालयाच्या शैक्षणिक वाटचालीत महत्वपूर्ण असतील.

तरी आपण वरील कार्यक्रमाला आवर्जुन उपस्थित राहून सहकार्य करावे, ही विनंती.

| | | |
|---|---|---|
| उद्घाटक | : | मा. अशोकजी भैया<br>सचिव, ने.हि. शिक्षण संस्था, ब्रम्हपुरी |
| प्रमुख अतिथी | : | मा. ॲड. भाष्करराव उराडे<br>सहसचिव, ने.हि. शिक्षण संस्था, ब्रम्हपुरी |
| | : | मा. डॉ. शंकर कुकरेजा<br>प्राचार्य, आदर्श महाविद्यालय, वडसा |
| | : | मा. डॉ. संजय सिंग<br>प्राचार्य, गो.वा. महाविद्यालय, नागभीड |
| | : | मा. गौरव अशोकजी भैया<br>सदस्य, ने.हि. शिक्षण संस्था, ब्रम्हपुरी |
| | : | मा. डॉ. नितीन उराडे, उद्योजक, ब्रम्हपुरी |
| | : | मा. निलेश मोहता, उद्योजक, ब्रम्हपुरी |
| अध्यक्ष | : | मान. डॉ. एन. एस. कोकोडे<br>प्राचार्य, ने. हि. महाविद्यालय, ब्रम्हपुरी |

*** आपले विनीत ***

| | | |
|---|---|---|
| डॉ. राजू आदे | डॉ. डी. एच. गहाणे | डॉ. एन. एस. कोकोडे |
| अध्यक्ष<br>माजी विद्यार्थी व पालक सभा | उपप्राचार्य<br>ने. हि. महा. ब्रम्हपुरी | प्राचार्य<br>ने. हि. महा. ब्रम्हपुरी |

**Session 2018-19 : Invitation Card to Alumni & Parents**







**Session 2018-19 : Alumni, Parents & Teacher Meet**




## N H College, Brahmapuri




A guest addressing the programme as others look on.

AN ALUMNI, parents and teachers meet was organised at N H College, Brahmapuri, recently. Ashok Bhaiya, Secretary N H Education Society, Brahmapuri, inaugurated the programme. Adv Bhashkarro Urade, Joint Secretary N H Education Society, presided over the function. Dr Krishna Raut, Dr Hitendra Dhote, Nilesh Mohata were present as chief guest. Prof G N Kela, Dr D A Pardhi, Dr Aslam Sheikh, Major Vinod Narad were present as guest of honour. Dr Hitendra Dhote explained the role of alumni and parents in current education system and new remedies for alumni association and parents meet. Dr Krishna Raut deliberated on alumni association, parents feedback and suggestion for reforms. Ashok Bhaiya said that alumni should always keep in touch with college and share their experience with students and teacher. Nilesh Mohata gave best wishes to alumni and parents for their future. Adv Bhashkarraoji Urade explained in his presidential speech how alumni, parents feedback are important to us. Dr N S Kokode introduced the guest and delivered introductory remarks of program. Dr Ajit Kajgiwale conduct the programme while Dr Raju Ade, Chairman of Alumni, Parent and Teacher Committee, proposed a vote of thanks. Dr D H Gahane, Dr. Mohan Kapgate, Prof Balaji Damkondwar, Prof Ratan Meshram, Prof Bandu Gedam. All teaching staff, Students, Alumni and parents gave a huge response to the programme.

News Paper : The Hitavada, Date : 27/03/2018

**Session : 2017 – 18 : Alumni, Parents and Teacher Meet**

# नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय

## ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर

नॅक : बी +

श्री/श्रीमती ____________________

आपणास निमंत्रित करतांना अत्यानंद होत आहे की, महाविद्यालयातर्फे **शिक्षक-पालक व माजी विद्यार्थी यांची संयुक्त सभा** दि. १६ मार्च २०१८ रोज शुक्रवारला सकाळी ११.०० वाजता स्वर्गीय हिरालालजी भैया सभागृह, ने. हि. महाविद्यालय, ब्रम्हपुरी येथे आयोजित केलेली आहे.

आपण आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे सन्माननीय पालक किंवा महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आहात. आपल्या सूचना व मौलीक मार्गदर्शन आमच्या महाविद्यालयाच्या शैक्षणिक वाटचालीत महत्त्वपूर्ण असतील.

तरी आपण वरील कार्यक्रमाला उपस्थित राहून सहकार्य करावे, ही विनंती.

उद्घाटक : मा. अशोकजी भैया, सचिव, ने. हि. शिक्षण संस्था, ब्रम्हपुरी

प्रमुख अतिथी : मा. ॲड. भास्करराव उराडे
सहसचिव, ने. हि. शिक्षण संस्था, ब्रम्हपुरी
मा. प्रा. डॉ. कृष्णा राऊत, ब्रम्हपुरी
मा. प्रा. डॉ. हितेंद्र धोटे, आदर्श कला व वाणिज्य महा. वडसा
मा. गौरव अशोकजी भैया, ब्रम्हपुरी
मा. निलेश मोहता, ब्रम्हपुरी
मा. नितीन उराडे, ब्रम्हपुरी
मा. इकबाल शेख, प्राचार्य, ने. हि. उच्च माध्य. विद्यालय, ब्रम्हपुरी

अध्यक्ष : मा. डॉ. एन. एस. कोकोडे, प्राचार्य, ने. हि. महाविद्यालय, ब्रम्हपुरी

✻ विनीत ✻

| प्रा. राजू आदे | डॉ. दिगांबर पारधी | डॉ. एन. एस. कोकोडे |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपप्राचार्य | प्राचार्य |
| माजी विद्यार्थी व पालक सभा | ने.हि.महाविद्यालय, ब्रम्हपुरी | ने.हि.महाविद्यालय, ब्रम्हपुरी |

**Session 2017-18 : Invitation Card to Alumni & Parents**

Deshaonnati 18/04/2018

# महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थांनी केली आजी विद्यार्थ्यांसाठी भरघोस मदत

*तालुका प्रतिनिधी / १७ एप्रिल*

**ब्रम्हपुरी :** येथिल नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयातील माजी विद्यार्थी व पालक संघटनेतर्फे गरीब, होतकरु आजी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कल्याणासाठी अनेक दानशूर माजी विद्यार्थी व पालकांनी आपले हात समोर करून भरीव मदत केली आहे.

यामध्ये कर्मयोगी मदनगोपालजी भैया ट्रस्टतर्फे विद्यार्थ्यांच्या आरोग्य सुविधेसाठी ॲम्बूलन्स , याशिवाय संस्था सदस्य व महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी गौरव अशोक भैया यांनी दीड लाख किमंतीची 'ऑरो वॉटर सिस्टम ' सुविधा उपलब्ध करुन दिल्यामुळे विद्यार्थ्यांना आता 'मिनरर वॉटर'ची सुसज्ज सुविधा उपलब्ध झाली आहे .संस्थेचे ज्येष्ठ सदस्य तथा माजी प्राचार्य सुभाष बजाज यांनी त्यांचे पाल्य ,आयुक्त समीर बजाज व मयूर बजाजच्या नावे एक लाख रुपयाचा निधी प्रदान केला . माजी विद्यार्थी तथा प्राचार्य डॉ एन.एस.कोकोडे, उपप्राचार्य डॉ डी.ए.पारधी ,डॉ धनंजय गहाणे, डॉ आरती समर्थ, डॉ धनराज खानोरकर, डॉ शगुप्ता असलम शेख, डॉ. राजेंद्र डांगे, डॉ अजित खाजगीवाले, प्रा. आकाश मेश्राम, प्रा रुपेश वाकोडीकर, डॉ किशोर नाकतोडे, प्रा निलिमा रंगारी, प्रा जयेश हजारे, डॉ अतुल येरपुडे इ.माजी विद्यार्थ्यांनी भरीव मदत करुन सहकार्य केले आहे.

या निधीतून गरिब, होतकरु विद्यार्थांच्या उत्थानासाठी शिष्यवृत्ती, 'कमवा व शिका' योजनेर्तंगत आर्थिक मदत,गरजू विद्यार्थ्यांना वैद्यकीय सुविधेसाठी आर्थिक मदत,तज्ज्ञांद्वारे विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन केले जाणार आहे.सदर योजनेत विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी मदत करणा-यांचे आभार मानून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ कोकोडे,समिती अध्यक्ष डॉ राजू आदेंनी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी व पालकांनी यात आणखी भरीव मदत करण्याचे आवाहन केले आहे.

**Session2017-18: RO Water System Donated by Alumni Shri Gaurav Ashok Bhaiya**

निर्णय तुमचाच देशोन्नती

23 फेब्रुवारी 2017

# आज ब्रम्हपुरीत 'मुलं घडविताना... आई' कार्यक्रम

**ब्रम्हपुरी :** ब्रम्हपुरीतील ने.हि. महाविद्यालयातील माजी विद्यार्थी, पालक सभा व महिला अध्ययन केंद्राच्या विद्यमाने गुरूवार दि. २३ फेब्रुवारी २०१७ रोजी स्व. हिरालाल भैया सभागृहात 'मुलं घडविताना... आई' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी आपल्या मुलावर उत्तम संस्कार करून ज्यांनी आपल्या मुलांना घडविले अशा कर्तबगार आईंना या कार्यक्रमासाठी पाचारण करण्यात आले आहे. यात प्रा.मंजूषा बजाज, लिला पाथोडे, कविताभाईक, तनुजा कोसे आपले मनोगत मांडणार असून मुलं घडविण्याचे तंत्र आणि मंत्र सांगणार आहेत. अध्यक्षपदी प्राचार्य डॉ. एन.एस. कोकोडे असतील तर प्रमुख अतिथीमध्ये संस्थाध्यक्ष स्नेहलता भैया, सचिव अशोक भैया राहणार असून या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन उपप्राचार्य डी.डी.ए. पारथी, प्रा. राजू आदे, प्रा. अजित खाजगीवाले, डॉ. विवेक नागभीडकर, डॉ. रेखा मेश्राम, डॉ. धनराज खानोरकर यांनी केले आहे.

# मुलांना मोती समजून त्यांच्यावर योग्य सुसंस्कार करा!

## 'मुलं घडविताना....आई उपक्रम - अशोक भैय्या'

*तालुका प्रतिनिधी /१२ मार्च*

**ब्रम्हपुरी :** 'आपली मुलं आपली संपत्ती असते. संपत्तीची जशी आपण काळजी घेतो तशी मुलांचीही घ्यायला हवी. मुलांना घडविण्यात आईचा वाटा सर्वात महत्त्वाचा असून आपल्या मुलांना मोती समजून त्यांच्यावर योग्य सुसंस्कार करा' असे मार्मिक विवेचन ने. हि. महाविद्यालयातील 'मुलं घडविताना...आई' या भावनाशिल उपक्रमाप्रसंगी संस्थेचे सचिव अशोक भैयांनी केले.



घडविताना... आई' हा विशेष कार्यक्रम पार पडला. अध्यक्षस्थानी ... कर्तबगार म्हणून प्रशासन सेवेत आहेत, मोठ्या पदावर आहेत अशा ...

की, 'मुलांना धाक हवा. त्यांना त्यांच्या आवडीचे क्षेत्र निवडू द्यावे. मुलांसाठी प्रसंगी जीव देणारी माताच असते. त्यांचे मि ६ कोणते ? तो काय करतो ? वेळेचे महत्व, शिस्त लावून आपली मुलं घडवावी.' असा सल्ला दिला. तनुजा कोसे यांनी आपल्या डॉक्टर झालेल्या स्नेहाबद्दल भावपूर्ण आपबिती सांगितली. कठिण परिस्थितीतून आपण मुलांना कसे घडविलो यावर भाष्य केले. आय. ए. एस. झालेल्या निलेशच्या आईने लिलाताईने मनमोकळया गप्पा मारीत संवाद साधला तर कविता भाईकनी ...

कोकोडे म्हणाले की, ''ज्यांना आदराने वंदन करावं अशा महा आई म्हणजे आजच्या मार्गदर्शिका होत. रक्ताचे पाणी करून ज्यांना संस्काराचे पीक मुलांना दिले, त्यामुळे मुलं घडलित.'' मी कसा घडलो ? याचे वर्णनही प्राचार्यांनी हृदयशील करून सभागृह भावूक केलात. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, परिचय उपप्राचार्य डॉ.डी.ए. पारधी, संचालन प्रा.राजू आदे तर आभार प्रा. अजित खागीवालेनी केले. यशस्वीतेसाठी डॉ.विवेक नागभीडकर, डॉ. धनराज खोरकर, डॉ. धनंजय गहाणे, डॉ. ...







**Session 2016 – 17 : Program** (मुल घडाविताना. . . . आई)
**organized by Alumni, Parents & Teacher Association**




कृष्णा राऊत : माजी विद्यार्थी व पालक मेळाव्याचे आयोजन

# आपल्या जीवनाच्या परीक्षेत उत्तीर्ण होण्यासारखे दुसरे खरे मेरीट नाही !




मार्गदर्शन करताना डॉ. कृष्णा राऊत, मंचावर डॉ. कोकाडे, डॉ. पारधी, डॉ. रणदिवे, ॲड. उराडे, डॉ. धोटे आदी.

ब्रह्मपुरी : आपण आपल्या गुरुजनांप्रती व महाविद्यालयाप्रती कृतज्ञ असले पाहिजे. आजच्या विद्यार्थ्यांची ज्ञानार्जनाची माध्यमे वेगळी असतील. महाविद्यालयातील अनेक विद्यार्थी गुणवत्ताधारक असतात. पायात काटा रुतल्यानंतर रक्त निघणे आणि डोळ्यातून अश्रू गळणे ही अवयव जाणीव एखाद्या गुरुप्रती असणे, हा त्या गुरुचा सन्मान आहे. विद्यार्थी शिकत असताना तो अनेक अंगाने फुलत असतो. पालकानेही सजग राहून पाल्याकडे लक्ष द्यावे. प्रश्नावलीसारख्या माध्यमातून अनेक पातळ्यावर तपास व्हावा. गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे. परंतु आपण आपल्या जीवनाच्या परीक्षेत उत्तीर्ण होणे, हेच खरे मेरीट होय, असे मार्मिक विवेचन वक्ते डॉ. कृष्णा राऊत यांनी केले.

ते ने. हि. महाविद्यालयात माजी विद्यार्थी व पालक संघ यांच्या सयुक्त सभेत प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. सभेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एन. एस. कोकाडे होते.

मंचावर प्रमुख उपस्थिती उपप्राचार्य डॉ. डी. ए. पारधी, डॉ. धनंजय गहाणे, उद्घाटक संस्था सहसचिव ॲड. भास्करराव उराडे तर प्रमुख अतिथीमध्ये प्रा. डॉ. रवी रणदिवे, प्रा. डॉ. हितेंद्र धोटे, पालक म्हणून नाट्यकलावंत हिरालाल पेंटर, समिती प्रमुख प्रा. राजू आदे उपस्थित होते.

उद्घाटक ॲड. उराडे यांनी या संस्थेचा इतिहास सांगितला. डॉ. रणदिवे यांनी या महाविद्यालयाने आम्हाला घडविले, असा कृतज्ञभाव वर्णीला. तर डॉ. धोटे यांनी नॅकबद्दलची भूमिका व पालक- माजी विद्यार्थ्यांचे महत्त्व सांगितले.

यावेळी मुख्याध्यापक शेख, डॉ. मोहन वाडेकर, बगमारे, प्रा. बोदेले यांनी विचार मांडले. हिरालाल पेंटूर यांनी पालक म्हणून मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. कोकाडेंनी महाविद्यालयातील विविध सोयी सुविधा विद्यार्थ्यांसाठी कशा सेवारत आहेत याची माहिती दिली.

प्रास्ताविक परिचय प्रा. राजू आदे, संचालन प्रा. प्रकाश वट्टी तर आभार प्रा. आकाश मेश्राम यांनी केले. यशस्वीतेसाठी प्रा. भुत्तमवार, प्रा. श्याम करंबे, प्रा. आनंद भोयर, प्रा. खाजगीवाले यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला पालक, माजी विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. (तालुका प्रतिनिधी)

लोकमत 5 एप्रिल-2017

**Session 2016-17 : Program Alumni, Parents and Teacher Association**




## ने.हि.महाविद्यालयात पालक शिक्षक सभेत विचारमंथन

**ब्रह्मपुरी:** नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात शुक्रवारी पालक-शिक्षक सभा पार पडली. या सभेत शैक्षणिक बाबीवर विचार मंथन करण्यात आले. सभेला माजी विद्यार्थी तथा माजी आमदार प्रा.अतुल देशकर, पालकांच्यावतीने उत्तम श्रीरामे, मोरेश्वर मुकुंदवार, प्रा.सुभाष बजाज यांनी यावेळी आपले विचार व्यक्त केले. सभेला ने.हि.शिक्षण संस्थेचे सचिव अशोक भैय्या, प्राचार्य डी.बाळबुद्धे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक प्राचार्य डॉ.एन.एस. कोकोडे, संचालन प्रा.राम वासेकर, परिचय प्रा.राजू आदे यांनी करुन दिला तर प्रा.प्रकाश वट्टी यांनी आभार मानले. सभेला ॲड.भास्कर उराडे, प्रा.डॉ.मोहन वाडेकर यांनीही मार्गदर्शन केले.

6 एप्रील 2016
दै. लोकमत




**Session 2015 – 16 : Alumni, Parents and Teacher Meet**

# माणूस घडविण्याच्या प्रक्रियेत महाविद्यालयाचे योगदान




*प्रतिनिधी /२६ एप्रिल*

**ब्रम्हपुरी** : माणूस घडविण्याच्या प्रक्रियेत महाविद्यालयाचे योगदान महत्वपूर्ण असून माजी विद्यार्थी महाविद्यालयासाठी गौरवास्पद व प्रेरणादायी आहे. विद्यार्थी विविध क्षेत्रात अत्युच्यस्थानी पोहचावे यासाठी महाविद्यालय त्यांना आवश्यक त्या सुविधा पुरविण्यास कटिबद्ध आहे. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.एन.एस. कोकोडे यांनी केले. माजी विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्या संयुक्त सभेच्या अध्यक्षस्थानावरून ते बोत होते.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी ॲड. भाष्करराव उराडे सहसचिव ने.ही. शिक्षण संस्था ब्रम्हपुरी, डॉ.एस.एस. कावळे, डॉ. कृष्णा राऊत, प्रा.डॉ. दिगांबर पारधी, ॲड. मनोहरराव उरकुडे, प्रभा मैद इत्यादी मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रमुख अतिथींनी आपले विचार व्यक्त केले.

या सभेला वैकुंठ टेंभूर्णे, किशोर डबले, ताराचंद नागोसे, आर.सी. चौधरी इत्यादी पालक व शिक्षक उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सभेचे अध्यक्ष प्रा. राजू आदे यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय प्रा. श्याम करंबे, संचालन प्रा. राम वासेकर आणि आभार प्रा. आकाश मेश्राम यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी प्रा. किशोर भुत्तमवार, माणिक दुपारे यांनी सहकार्य केले.




**Session 2014 – 15 : Alumni, Parents and Teacher Meet**

# माजी विद्यार्थी महाविद्यालयाचे भूषण

ब्रह्मपुरी : माजी विद्यार्थी महाविद्यालयाचे भूषण असून अनेक विद्यार्थी जीवनाच्या विविध क्षेत्रात अतुलनिय कामगिरी करीत आहेत. हे महाविद्यालयाससाठू भूषणावह आहे, असे मत प्राचार्य डॉ. एन.एस. कोकोडे यांनी केले.

नेवजाबाई हितकारणी महाविद्यालयात आयोजित माजी विद्यार्थी व पालक यांच्या संयुक्त सभेच्या अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. अतुल नागरे, प्रा. डॉ. मोतीलाल दर्वे, उपप्राचार्य डॉ. डी.ए. पारधी, प्रा.राजु आदे आदी उपस्थित होते.

याप्रसंगी माजी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रा. डॉ. मोतीलाल दर्वे यांनी महाविद्यालयात व्यवसायभिमुख अभ्यासक्रम राबवावे, असे मत व्यक्त केले. माजी विद्यार्थी व



मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. कोकोडे. उपस्थित डॉ.नागरे, डॉ.दर्वे.

पालकांतर्फे डॉ. अतुल नागरे, प्रा. नामदेव जेंगठे, प्रा. वर्षा चंदनशिवे यांच्यासह उपस्थित प्राध्यापकांनी विचार व्यक्त केले. प्रास्ताविक समिती अध्यक्ष प्रा. राजु आदे यांनी केले. संचालन प्रा.राम वासेकर यांनी तर आभार प्रा. प्रकाश मेश्राम यांनी मानले. कार्यक्रमाला प्रा.अनिल कोडापे, प्रा. मोहन कापगते, प्रा. बालाजी दमकोंडवार, प्रा. प्रकाश वट्टी, प्रा. पद्माकर वानखेडे, प्रा. भाष्कर लेनगुरे, प्रा. सुनील चौधरी, प्रा. असलम शेखआदी प्राध्यापकवृंद उपस्थित होते. (शहर प्रतिनिधी)




**Alumni, Parents and Teacher Meet , Session : 2013 – 14**